# विद्यापीठ प्रवेश परीक्षा प्रक्रिया वेळापत्रक जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या २०१९-२० च्या विविध अभ्यासक्रमांसाठीची ऑनलाइन प्रवेश परीक्षा प्रक्रिया २८ मे पासून सुरू होणार आहे. १७ एप्रिलपासून ऑनलाइन अर्ज प्रकियेला सुरुवात होणार आहे. याबाबतचे पहिल्या टप्प्यातील वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले आहे. यंदाच्या प्रवेश परीक्षा मे अखेरपर्यंत सुरू राहणार आहेत. २८ मे रोजी एम. ए., एमएस्सी, मास कम्युनिकेशन, एमएस्सी, भूगोल, अल्कोहोल टेक्नॉलॉजी, शुगर टेक्नॉलॉजी, ॲग्रोकेमिकल, जिऑलॉजी. बी. लिब. एमजेसी, इलेक्ट्रॉनिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा होणार आहेत.

# विद्यापीठाचा इतिहास ग्रंथातून उलगडणार!

## लेखनास प्रारंभ; पाच सदस्यीय समितीची स्थापना

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाची स्थापना. वेगवेगळ्या महाविद्यालयांचा विकास. अध्ययन, अध्यापन, संशोधन क्षेत्रातील भरारी. विद्यार्थ्यांची झालेली प्रगती व समाजासाठीचे योगदान, अशा अनेक महत्त्वपूर्ण घटनांचा समावेश असणाऱ्या विश्वासार्ह संदर्भग्रंथ लेखनास प्रारंभ झाला आहे. ग्रंथाच्या माध्यमातून नव्या पिढीसमोर विद्यापीठाच्या इतिहासाचा उलगडा होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या निर्मितीची पार्श्वभूमी, स्थापना व त्यानंतरच्या अनेक विद्यापीठांशी निगडित विविध गोष्टी समाजासमोर येऊन कागदपत्रांचा



दस्तऐवज तयार व्हावा, या उद्देशाने विद्यापीठ संदर्भग्रंथ इतिहास लेखन करण्यात येत आहे. गेल्यावर्षी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने डॉ. भालबा विभुते यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. जे. एफ. पाटील, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची पाच सदस्य इतिहास लेखन समिती स्थापन करण्यात आली आहे.

विद्यापीठाची निर्मिती, तावडे समितीचा अहवाल, विधानसभा, विधान परिषदेतील चर्चा, १९६२ पासून आजपर्यंत झालेली वाटचाल, विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रांत झालेली प्रगती, परीक्षा विभाग स्थापना, दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुण्यांची भाषणे, नवीन अधिविभागनिर्मिती, संशोधनात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळालेले पुरस्कार, विद्यार्थी विकासाच्या योजना, विद्यार्थिनी वसतिगृहाची निर्मिती, आर्थिक घडामोडी, आंदोलने अशा ५५ वर्षांतील अनेक घटना, घडामोडींचा समावेश संदर्भग्रंथामध्ये असणार आहे. सद्यस्थितीत विद्यापीठाचे हयात असलेले कुलगुरू यांच्या मुलाखती, विद्यापीठाच्या सुरुवातीच्या काळातील लोक, विविध अधिकार मंडळांच्या ठराविक लोकांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

विद्यापीठ इतिहास लेखनाशी संबंधित माहिती संकलनाचे काम सुरू आहे. विद्यापीठात यासंदर्भात एक रिसर्च सेंटर सुरू करण्यात यावे, अशी सूचना समिती सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाकडे केली आहे.

> शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास लेखनामुळे स्थापनेमागील उद्देश, त्यावेळची आखण्यात आलेली रणनीती या गोष्टी प्रामुख्याने पुढे येतील. विद्यापीठाचा वेगवेगळ्या टप्प्यातील विकास, विद्यार्थी विकासाची गती, समाजाशी जोडलेली नाळ आदी माहिती समोर येण्यास मदत होईल. हे काम मोठे असले, तरी वर्षभरात संदर्भग्रंथ तयार होईल, अशी अपेक्षा आहे.
>
> **- डॉ. भालबा विभुते,**
> अध्यक्ष, इतिहास लेखन समिती
> शिवाजी विद्यापीठ

# विद्यापीठाच्या ऑनलाईन प्रवेश परीक्षा २८ मेपासून सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या विविध अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार दि. २८ मेपासून ऑनलाईन प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहेत.

विद्यापीठाच्या वतीने दि. १७ एप्रिलपासून ऑनलाईन अर्ज प्रक्रियेस सुरुवात होणार आहे. दि. २८ मे रोजी एम.ए., एम.एस्सी. भूगोल, मास कम्युनिकेशन, एम.एस्सी. अल्कोहोल टेक्नॉलॉजी, बॅचलर व मास्टर ऑफ जर्नालिझम, एम.एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, एम.एस्सी. ॲग्रो केमिकल व पेस्ट मॅनेजमेंट, एम.एस्सी. जिऑलॉजी, बी.लिब अँड इन्फॉ. सायन्स, एम.लिब अँड इन्फॉ. सायन्स, एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक आदी विषयांच्या प्रवेश परीक्षा होतील.

दि. २९, ३० मे रोजी विविध विषयांचे अभ्यासक्रम व त्यानंतर दि. १, ४, ६ व ७ जून रोजी प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहेत. याबाबतची अधिक माहिती विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यापीठाने जाहीर केलेले अधिकृत वेळापत्रक पाहून विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.